# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

पाचवा मजला, एमएमटीसी हाऊस ई-ब्लॉक, सी-२२, वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

दूरध्वनी व फॅक्स क्र. ०२२-२६५७२६३१ ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा. क्र.का.आ/मइवइबाकमं/५४ मंडळ बैठक/ १८० / २०२० दिनांक. 18 MAR 2020

**प्रति**

**मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
५ वा मजला, दालन क्र.५०६ व ५०७ ॲनेक्स बिल्डींग, मंत्रालय, मुंबई-३२

**शासकीय प्रतिनिधी**

मा. प्रधान सचिव,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-३२

मा. कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,
बान्द्रा-कुर्ला संकुल, बान्द्रा (पुर्व),
मुंबई ४०० ०५१

मा.सह सचिव/ उपसचिव, कामगार-७,
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३

**मालक प्रतिनिधी**

मा.श्री. पी.आर. मुंडले,
१६४, शिवाजीनगर,
नागपूर ४४०० १०

मा. श्रीम. मेघा धवल आगटे,
सी/२८ सोबा ऑप्टीमा,
वडगाव बुद्रूक माणिकबाग
पुणे,४११०४१

मा. श्री. सतीश मगर, पुणे
मेगास्पेस १३, सोलापूर बाणेर रोड,
पुणे ४११ ००१

**कामगार प्रतिनिधी**

मा. श्री. अशोक गोविंदराव भुताड,
प्लॉट नं.१९ रेशीम बाग
डॉ. गिल्लोकर हॉस्पीटल
जवळ उम्रेड रोड, नागपूर ४४०० ०९.

मा. श्री. श्रीपाद कुटासकर
द्वारा भा.म.संघ कार्यालय,
श्रीसुधा अपार्टमेंट,
१५ देवगीरी कॉलनी, औरंगाबाद.

मा.श्री. विजय देवरूखकर, मुंबई
३/१३, चारकोप सिध्दयोग को-ऑप हौसिंग
सोसायटी लि.,आर.डी.पी.-८
प्लॉट न.२३२ ,सेक्टर ४,चारकोप,
कांदीवली (प.) मुंबई ४०० ०६७.

विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.१३.०३.२०२० रोजी संपन्न झालेल्या ५४ व्या बैठकीच्या इतिवृत्तांताबाबत

**महोदय,**

मा. मंत्री महोदय कामगार विभाग तथा अध्यक्ष,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाची ५४ वी बैठक दि. १३.०३.२०२० रोजी दूपारी १२.०० वा समिती सभागृह, दालन क्र.५०६ ॲनेक्स बिल्डींग, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मंडळाचे मा. अध्यक्ष महोदयांनी मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर इतिवृत्तांत सोबत पाठविण्यात येत आहे. मंडळाच्या आगामी बैठकीत सदर इतिवृत्तांत कायम करण्यात येणार असून तत्पूर्वी त्यामध्ये काही बदल सुचवावयाचे असल्यास तसे मंडळास कळविण्यात यावे, हि विनंती.

आपला विश्वासू,
१८/३/2020
(श्री.चु. श्रीरंगम)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,मुंबई.
एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,
बांन्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५४ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

बैठक स्थळ :- समिती सभागृह, दालन क्र.५०६ ॲनेक्स बिल्डींग, मंत्रालय, मुंबई-४०० ३२

दिनांक. :- १३.०३.२०२० वार :- शुक्रवार

वेळ :- दुपारी १२.०० वाजता

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | मंडळाच्या दिनांक १३.०२.२०२० रोजी संपन्न ५३ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | ०४-०५ |
| २. | प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेंअंतर्गत (PM-SYM) नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना योजनेचे सभासद बनविण्यासाठी ग्राम रोजगार सेवकाची मदत घेणेबाबत विचारविनिमय करणे. | ०६-१३ |
| ३. | मंडळाच्या विविध योजनांचे RFP प्रारूप तयार करणे, निविदा प्रकिया व निविदा प्रक्रियेशी संबंधित कामकाजाकरीता ई-गव्हर्नन्स सल्लागारची नियुक्ती करणेबाबत विचारविनिमय करणे. | १४-१७ |
| ४. | मंडळाविरूध्द मा. सर्वोच्च् न्यायालय, मा. उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणी संबंधित न्यायालयाशी संपर्क साधणे, न्यायालयीन प्रकरणांचे परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे, सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेअंती न्यायालयात सादर करणे इतर अनुषंगिक कामाकरीता विधी सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत विचारविनिमय करणे. | १८-२५ |
| ५. | सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या लेखाविषयक कामकाजासाठी व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालांची नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत विचारविनिमय करणे. | २६-२७ |
| ६. | मंडळाच्या सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाच्या लेख्यास मान्यता प्रदान करणे | २८-२९ |

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक १३.०३.२०२० रोजी संपन्न झालेल्या ५४ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील, मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५४ वी बैठक शुक्रवार दिनांक १३.०३.२०२० रोजी दुपारी ०४.०० वा. समिती सभागृह, दालन क्र.५०६ ॲनेक्स बिल्डींग, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | मा.मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ८. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय,कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक १३.०२.२०२० रोजीच्या मंडळाच्या ५३ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.१३.०२.२०२० रोजी संपन्न ५३ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग व मंडळाचे मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५३ वी बैठक दिनांक १३.०२.२०२० रोजी सायंकाळी ०४.०० वा. एमएमटीसी हाऊस पाचवा मजला, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा. अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. मंजूर इतिवृत्तांताची प्रत मंडळाच्या सर्व सन्मानीय सदस्यांना दि.०३.०३.२०२० रोजी ई-मेलद्वारे पाठवून बदल असल्यास सूचविणेबाबत कळविण्यात आले होते. सदर इतिवृत्तांत काही बदल करावयाचे असल्यास त्या बदलासह इतिवृत्तांत कायम करणे प्रस्तावित आहे.

मंडळ सचिव यांनी मंडळाच्या ५३ व्या बैठकीत पारित ठरावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ बैठकीत सादर केला. ५३ व्या बैठकीतील विषय क्र.०२ बाबत पारित ठरावाला अनुसरून नोंदीत बांधकाम कामगारांना हत्यारे/अवजारे खरेदीकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य रू.५०००/- ही योजना बंद करण्याबाबत मंडळाच्या दि.१५.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले होते. दि.१५.०२.२०२० पासून सदर योजनेंतर्गत लाभाचे अर्ज स्विकारू नये, माहे डिसेंबर २०१९ पर्यंत लाभ वाटप, खर्च व प्रलंबित अर्जांची माहिती मागविण्यात आली आहे. सर्व जिल्हा कार्यालयांनी सादर केलेल्या माहितीनुसार माहे डिसेंबर २०१९ पर्यंत ६,१९,८३७ बांधकाम कामगारांना लाभ वाटप करण्यात आलेला आहे, सदर लाभ वाटपावर ३०९.९२ कोटी एवढा खर्च झालेला आहे. माहे डिसेंबर २०१९ पर्यंत जिल्हा कार्यालयाकडे ४,५१,५५४ नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचे अर्ज प्रलंबित आहेत.

याबाबत चर्चेस सहभागी होताना श्री. श्रीपाद कुटास्कर, मंडळ सदस्य यांनी सादर केले की, सदर योजना मंडळाच्या दि.१३.०२.२०२० रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार बंद करण्यात आलेली आहे. परंतु, माहे डिसेंबर २०१९ पर्यंत लाभाकरीता अर्ज सादर केलेल्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात यावा.

याबाबत मंडळ अध्यक्षांनी निर्देश दिले की, प्रलंबित लाभाचे अर्ज तपासून लाभ वाटप करण्यास हरकत नाही.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५४(१)/२०२०:- मंडळाच्या दिनांक १३.०२.२०२० रोजीच्या ५३ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे तसेच, मंडळाच्या ५३ व्या बैठकीतील ठराव क्र. ५३(०२)/२०२० नुसार जिल्हा कार्यालयाकडून मागविण्यात आलेल्या माहितीनुसार जिल्हा कार्यालयाकडे माहे डिसेंबर २०१९ पर्यंत अवजारे/ हत्यारे खरेदी करीता नोंदीत बांधकाम कामगारांनी सादर केलेल्या अर्जापैकी प्रलंबित असलेले ४,५१,५५४ अर्जांची तपासणी करून लाभ वाटपाची कार्यवाही करणेबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना सूचना देण्यात याव्यात असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०२:- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेंअंतर्गत (PM-SYM) नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना योजनेचे सभासद बनविण्यासाठी ग्राम रोजगार सेवकाची मदत घेणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य विम्याच्या छत्राखाली आणण्यासाठी त्यांच्या सार्वजनिक विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट करण्याबाबत मंडळामार्फत दि. ०६.०६.२०१७ रोजी झालेल्या संपन्न बैठकीत ठराव पारीत करण्यात आलेला होता.

त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुंटुबिंयासाठी आरोग्य विमा योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या दि. १९.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस्तव सादर केलेला होता, व शासनाने दि. ०१.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर योजना राबविण्याकरीता मंजूरी प्रदान केली. शासन निर्णय क्र. इबांका-१०१६/९२/प्र.क्र. २०/काम-७, दि. २१.०९.२०१६ अन्वये उक्त योजना लागू करणेबाबतचा शासन निर्णय पारीत करण्यात आला तसेच मंडळातील नोंदीत सक्रीय (जिवीत) असलेल्या बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबित कुंटुबिंयाचा समावेश महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनामध्ये समाविष्ट करण्याकरीता शासन निर्णय क्रमांकःमफुयो-२०१६/प्र.क्र.३१६/आरोग्य- दि.०२.०६.२०१७ निर्गमित करण्यात आला होता.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत दारिद्रय रेषेखालील पिवळे, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक व केशरी पत्रिकाधारक (रू. १ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेली) कुटुंबांना लागू करण्यात आली असून सदर कुटुंबांचा विमा हप्ता सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत विमा कंपनीस नियमित अदा करण्यात येतो. तसेच दि. २१.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंडळाने जारी केलेल्या ओळखपत्राच्या आधारे शिधापत्रिका धारक नसलेला नोंदीत बांधकाम कामगार सदर योजनेचा लाभ घेत आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारक नसलेल्या बांधकाम कामगारांची संख्या व यादी मंडळाकडून राज्य आरोग्य हमी सोसायटीस सादर करण्यात आली होती. त्यानुसार एकुण ४८,५३३ शिधापत्रिकाधारक नसलेल्या बांधकाम कामगारांपैकी व्यवस्थितपणे डाटा प्राप्त झालेल्या ४५,५९४ बांधकाम कामगारांचा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य् योजनेत दि. ०६.१२.२०१८ पासून समावेश करण्यात आला आहे. या योजनेव्दारे बांधकाम कामगारांना प्रति कुटूंब प्रति वर्ष रू. १.५ लक्षापर्यंत वैद्यकीय उपचाराकरीता विमा संरक्षण अनुज्ञेय आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/ आरोग्य-६ दि.२६.०२.२०१९ अन्वये केंद्र शासनाची प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना या योजना संयुक्त पध्दतीने Insurance व Assurance Mode वर एकत्रितपणे राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयात योजना राबविण्याची कार्यपध्दती, राज्य स्तरीय संनियंत्रण व कार्यकारी समिती, वित्तीय भार, विमा कंपनीची निवड, रूग्णालयाचे अंगीकरण, उपचार, योजनेतील रुग्णालय, योजना अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने निवड केलेली विमा कंपनी आणि अंगीकृत करण्यात येणार रूग्णालये यांच्याशी करावयाच्या करानाम्याचे अधिकारी, अंमलबजावणीचे नियम, कर्मचारी नियुक्ती, खर्चाचे अधिकार इत्यादी बाबत तपशील नमूद करण्यात आलेला आहे.

इतर तत्सम समान स्वरूपाच्या अन्य योजना संबधित विभाग/ कार्यालयाकडून राबविण्यात येत असतील तर लाभाची द्विरूक्ती टाळण्याकरीता ज्या दिनांकास सदरील योजना सुरू होईल त्या दिनांकास संबंधित विभागांनी त्या बंद कराव्यात तसेच संबंधित विभागांनी विमा हप्ता अदा करताना द्विरूक्ती टाळण्याच्या अनुषंगाने लाभार्थ्यासंबंधात तपासणी करणे आवश्यक रहील, असे नमूद केले आहे.

राज्य आरोग्य सोसायटीकडून योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यांनतर नियुक्त संस्थेसोबत झालेल्या करारानुसार सदर योजना मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना लागू करण्यासाठीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला होता. मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव ५०(५)/२०१९ :- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि.२६.०२.२०१९ मधील अटी शर्तीनुसार मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्य आरोग्य सोसायटीकडून नियुक्त संस्थेसोबत होणाऱ्या करारानुसार वार्षिक विम्याची रक्कम मंडळामार्फत अदा करण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

केंद्र शासनाच्या दि.२५.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर योजनेत समाविष्ट करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहे. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या यादीतील बांधकाम कामगारांपैकी सन २०११ च्या सामाजिक, आर्थिक व जातनिहाय Socio Economic Caste Census (SECC) जणनगणनेनुसार PMJAY योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची यादी वेगळी करून सदर लाभार्थ्यांना योजनेचे कार्ड देण्यात यावे. तसेच, नोंदीत बांधकाम कामगारांपैकी SECC च्या यादीत समाविष्ट नसलेल्या लाभार्थ्यांकरीता स्वतंत्र प्रस्ताव तयार करून सदर

लाभार्थ्यांच्या विम्याची रक्कम मंडळाकडून अदा करण्यात यावी व त्या लाभार्थ्यांनांही योजनेचा लाभ देण्यात यावा असे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

सह सचिव आणि संचालक (कामगार कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे संपन्न दि.१६.१२.२०१९ रोजीच्या संनियत्रण समितीच्या बैठकीत मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जनआरोग्य् योजनेचा लाभ देण्याकरीता संबंधित राज्यातील National Health Agency (NHA) सोबत समन्वय साधून सदर योजनेचा लाभ बांधकाम कामगारांना देण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर बैठकीच्या अनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी National Health Authority (GoI) यांचेकडूनही दि.१६.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये योजना राबविण्याबाबतचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

सह सचिव आणि संचालक (कामगार कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१.०२.२०२० रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरसिंग मध्ये देखील सदर योजनेचा जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या केंद्र शासनाच्या योजनेत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना (SECC), २०११ च्या यादीत समाविष्ट कुटुंबांना लाभार्थी म्हणून समाविष्ट करण्यात आले असून त्यांना प्रति कूटूंब प्रति वर्ष रू. ५ लक्षापर्यंत वैद्यकिय उपचाराकरीता विमा संरक्षण अनुज्ञेय आहे. सदर लाभार्थीना संगणक प्रणालीव्दारे ई-कार्ड ओळखपत्र देण्यात येते. नजीकच्या अंगीकृत रुग्णालयाची किंवा सामान्य सेवा केंद्रावर (CSC) बांधकाम कामगार आपले नाव यादीत आहे किंवा नाही हे पाहू शकतो व ई-कार्ड प्राप्त करू शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात दि.०६.०३.२०२० रोजी आयोजित बैठकीमध्ये सन २०११ च्या समाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेनुसार राज्यातील ८३.०५ लक्ष लाभार्थ्यांची यादी Hard Disk मध्ये मंडळास उपलब्ध करून दिलेली आहे. याशिवाय राज्य शासनाच्या ४९२ अंगीकृत रुग्णालयांची यादी सुध्दा उपलब्ध करून दिली आहे. सदर यादीतील लाभार्थ्यांपैकी मंडळाकडे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची संख्या किती याबाबतचा शोध घेणेबाबत मंडळाने नियुक्त केलेल्या मे. आयटीआय प्रा.लि आणि मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेस निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर यादीतील बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे कार्ड उपलब्ध करून दिल्यास प्रस्तावित योजनेचा लाभ घेणे शक्य होईल.

मंडळाकडील नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांपैकी केंद्र शासनाने प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेकरीता पात्र ठरविलेल्या बांधकाम कामगारांना CSC केंद्रामार्फत अथवा अंगीकृत रुग्णालयांतील ई-कार्ड उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. या कामाकरीता मनरेगा योजनेअंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सेवकाची मदत घेण्याचे प्रस्तावित आहे.

## प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना (PM-SYM)

केंद्र शासनाने अंसघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारीत केलेला आहे त्या अनुषंगाने विविध व्यवसाय गट जसे कि बांधकाम कामगार, सुरक्षा रक्षक, घरेलू कामगार, फेरीवाले, शेतमजुर, गृह उद्योगातील कामगार, माथाडी कामगार, बिडी कामगार, यंत्रमाग कामगार, आशा वर्कर, आंगणवाडी सेविका यासारख्या विविध १२७ व्यवसाय गटातील असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने "प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना" लागू करण्याबाबतचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे व दि. १५.०२.२०१९ पासून नोंदणीचा शुभारंभ करण्यात आलेला आहे.
प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

अ) **लाभार्थी पात्रता :-**

- असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार
- मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी
- कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसावा

ब) **आवश्यक कागद पत्रे** :-

- आधार कार्ड
- बँक पासबुक (राष्ट्रीय कृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बॅक)
- भ्रमणध्वनी (OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा)

क) **योजनेचा लाभ :-**

- वय वर्ष ६० पूर्ण केल्यानंतर दरमहा रु. ३०००/-मानधन
- लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या वैवाहिक जोडीदारास योजना सुरु ठेवता येणार
- लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत मिळणार.

केंद्र शासनाचे कामगार व रोजगार मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेत नोंदणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार, मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा

निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.

२. १८ ते ४० वयोगटातील लाभार्थीने रु.५५ ते २००/- पर्यंत प्रतिमाह (वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत)अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची ६० वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा किमान ३०००/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.

३. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस नजिकच्या नागरी सुविधा केंद्रास (Common Service Centres) भेट दयावी लागेल.

४. लाभार्थीस नागरी सुविधा केंद्रामध्ये गेल्यानंतर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

क) आधार कार्ड
ख) बॅक पासबुक ( राष्ट्रीय कृत बॅक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बॅक)
ग) भ्रमणध्वनी ( OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा )
घ) पहिले मासिक अंशदान(रोख स्वरुपाने ,वयानुसार)

५. नागरी सुविधा केंद्रामार्फत बँक खात्याचा तपशील, ई-मेल आयडी, वारसदार (पती-पत्नी( व भ्रमणध्वणी क्रमांक याबाबतचा तपशील अद्यावत केला जाईल.

६. लाभार्थीच्या वयानुसार अंशदानाची रक्कमेची गणना ऑनलाईन सिस्टीमद्वारे करण्यात येईलपहिल्या मासिक ,पात्र लाभार्थीच्या वयानुसार ,योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी . ) रावी लागेलअंशदानाची रक्कम रोखीने अदा कप्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना वय निहाय मासिक वर्गणीचा तक्ता दर्शविणारे प्रपत्र — २ सोबत जोडले आहे .( अंशदानाची रक्कम भरणा केल्याची पावती संबंधीत नागरी सुविधा केंद्राकडून .लाभार्थीस देण्यात येईल

७. दुस-या मासिक अंशदानापासून लाभार्थीचे अंशदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात (auto-debit) करण्यात येईल.

१. लाभार्थीने योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी योजनेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र व छापील सहमती पत्र, स्कॅन करण्यात येऊन सिस्टीमवर अपलोड करण्यात येईल.

९. पहिले मासिक अंशदान जमा केल्यानंतर प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजनेंतर्गत LIC द्वारे पेन्शन खाते क्रमांक जारी करण्यात येईल.

१०. नोंदणीची प्रकिया पुर्ण झाल्यानंतर लाभार्थीस प्रधानमंत्री श्रम योगी मानधन कार्ड व

स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र देण्यात येईल.

११. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना खाते सुरू झाल्यानंतर लाभार्थीस लाभार्थीचे बॅक खात्यातुन परस्पर कपात केलेल्या अंशदानाची माहीती एसएमएस द्वारे देण्यात येईल.

१२. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस इतर कोणतेही शुल्क नागरी सुविधा केंद्रास अदा करावे लागणार नाही. त्याबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्रास केंद्र शासनाकडून परस्पर अंदा करण्यात येईल.

- केंद्र शासनच्या कामगार विभागामार्फत ३१ मार्च २०१९ अखेर दोन कोटी लाभार्थींचा योजनेमध्ये सहभागी करण्याचा लक्षांक ठेवण्यात आलेला असल्याने महाराष्ट्र राज्यामध्ये ३१ मार्च २०१९ अखेर, राज्यात असणारे सुमारे ४६००० नागरी सुविधा केंद्राकडून,प्रत्येकी किमान १०० या प्रमाणे, लाभार्थींची नोंदणी करणे आवश्यक होते.
- प्रधान मंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबत दि. २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कॅबिनेट सेक्रेटरी/केंद्र शासन यांनी आयोजित केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उपरोक्त निर्देश दिले आहेत की, राज्यांच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांच्या अधिका-यांना सदर योजनेत अधिकाअधिक नोंदणी करण्याबाबत अवगत करावे तसेच सदर मंडळाद्वारे आपल्या मंडळातील नोंदित कामगारांचे प्रथम वर्षाचे अंशदान भरण्यात यावे असे निर्देश प्राप्त झालेले होते.

सदर निर्देशास अनुसरून मंडळाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या ५० व्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव ५०(४)/२०१९ :- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी पात्र बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन (PM-SYM) योजना लागू करण्यात यावी. बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम ०१ वर्षाचे अंशदान मंडळाने नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करावे. सदर योजनेची माहिती सर्व बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्याकरीता आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठराव व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंडळाकडे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराच्या नोंदणीचाचा तपशील विहीत नमुन्यात CSC मार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | माहिती पाठविल्याचा दिनांक | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची संख्या |
|---|---|---|
| १. | ०१/०७/२०१९ | ४४,७९० |
| २. | ०६/११/२०१९ | ७०,०२० |
| ३. | १६/११/२०१९ | १४,२१८ |
| ४. | २७/११/२०१९ | १५,४०७ |
| ५. | ०२/१२/२०१९ | १३,९८३ |
| ६. | २०/१२/२०१९ | ३३,५८९ |
| ७. | २६/१२/२०१९ | १९,७७१ |
| ८. | ०६/०१/२०२० | ३४,२४४ |
| ९. | २०/०१/२०२० | ३८,१११ |
| १०. | २७/०१/२०२० | १४,८८१ |
| ११. | ०३/०२/२०२० | ११,३७५ |
| १२. | १८/०२/२०२० | २७,७९० |
| १३. | २५/०२/२०२० | १३,७२३ |
| १४. | ०४/०३/२०२० | ८५२५ |
| | **एकूण** | **३,६०,४२७** |

सदर यादीची पडताळणी करून वय वर्ष १८ ते ४० या वयोगटातील व योजनेच्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या केवळ १०,१५४ लाभार्थींची यादी मंडळास प्राप्त झाली आहे. उर्वरित डेटा पडताळणी करण्याची कार्यवाही CSC मार्फत करण्यात येत आहे. प्राप्त १०,१५४ लाभार्थ्यांची जिल्हानिहाय यादी दि.२९.०१.२०२० रोजी संबंधित जिल्हयांना पाठविण्यात आलेली आहे. सदर जिल्हयातील नागरी सुविधा केंद्रामार्फत (CSC) सभासद करून घेण्याबाबत बांधकाम कामगारांना सहाय्य करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याशिवाय मंडळाने तयार करून दिलेल्या नमुन्यामध्ये लघुसंदेश CSC मार्फत पात्र १०,१५४ बांधकाम कामगारांना पाठविण्यात आलेला आहे.

मंडळाकडे नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांपैकी केंद्र शासनाने तपासणीअंती पात्र ठरवलेल्या पात्र लाभार्थीपैकी सदर योजनेचे सभासद झालेल्या बांधकाम कामगारांच्या मासीक वर्गणीपैकी ५०% लाभार्थी हिस्याची रक्कम मंडळाकडून अदा करण्यात येणार आहे व उर्वरीत ५०% रक्कम केंद्र शासनामार्फत LIC ला अदा करण्यात येणार आहे. योजनेच्या सभासदांना वयाच्या ६० वर्षानंतर रू. ३०००/- प्रति महिना या प्रमाणे पेन्शन मिळणार आहे.

सदर ग्रामरोजगार सेवक प्रत्येक लाभार्थी नोंदीत बांधकाम कामगारास CSC केंद्रामार्फत दोन्ही योजनेंतर्गत नोंदीत करून अनुक्रमे श्रमयोगी मानधन कार्ड व ई-कार्ड उपलब्ध करून देण्यास सहाय्य करेल त्याकरीता आवश्यक लाभार्थी यादी त्यानी संबंधित जिल्हा कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी व नोंदीत बांधकाम कामगारांनी दोन्ही योजनांचा कार्ड उपलब्ध करून दिल्याचा तपशील जिल्हा कार्यालयांना सादर करावा. सदर तपशील तपासून जिल्हा कार्यालयांनी ग्राम रोजगार सेवकास निर्धारित शुल्क अदा करावे असा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

याबाबत चर्चेत सहभागी होताना श्री. श्रीपाद कुटास्कर, मंडळ सदस्य यांनी सूचित केले की, सदर कामाकरीता कामगार संघटनांची मदत घेण्यात यावी.श्री. सतीश मगर, मंडळ सदस्य यांनी सूचित केले की, मनरेगा अंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सेवक ग्रामीण भागात कार्यरत आहेत. शहरी भागातील बांधकाम कामगारांची संख्या जास्त आहे. सदर बांधकाम कामगारांना योजनेचे कार्ड उपलब्ध करून देणेबाबतही विचार व्हावा. मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सदर मद्दयाबाबत सहमती दर्शविली याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले की, प्रधान सचिव, कामगार विभाग व संबंधित अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन याबाबत निर्णय घ्यावा व त्यानुसार प्रस्ताव आगामी बैठकीत सादर करावा. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५४(२)/२०२०:-प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सन २०११ च्या सामाजिक, आर्थिक व जातनिहाय Socio Economic Caste Census (SECC) जणनगणनेनुसार PMJAY योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपैकी नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना या योजनेचे कार्ड देण्याकरीता तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेअंतर्गत मंडळाने CSC मार्फत केंद्र शासनास सादर केलेल्या लाभार्थ्यांच्या माहितीपैकी पात्र लाभार्थ्यांच्या यादीतील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर योजनेचे कार्ड देण्याकरीता ग्रामीण व शहरी भागात कोणत्या संघटनांची/ संस्थांची/ ग्रामरोजगार सेवकांची मदत घेता येईल, प्रती कार्ड किती मोबदला देता येइल याबाबत मा.प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखालील बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा व याकरीता अपेक्षित खर्चाच्या तपशीलासह प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत विचारविनिमयाकरीता सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०३:- मंडळाच्या विविध योजनांचे RFP प्रारूप तयार करणे, निविदा प्रकिया व निविदा प्रक्रियेशी संबंधित कामकाजाकरीता ई-गव्हर्नन्स सल्लागारची नियुक्ती करणेबाबत विचारविनिमय करणे.**

राज्याचे प्रशासन अधिक गतीमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे शासनाचे धोरण आहे. कामगार विभागाचे एकात्मिक कामगार व्यवस्थापन प्रणाली (ILMS) राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यास अनुसरून माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.०१.०७.२०१४ नुसार सदर शासन निर्णयातील empanelled संस्थेपैकी ०४ संस्थांना दि.२०.१२.२०१६ रोजी मा. मंत्री महोदय कामगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न् बैठकीत सादरीकरणासाठी बोलविण्यात आले होते. सदर बैठकीस प्रधान सचिव कामगार, कामगार आयुक्त, संचालक माहिती व तंत्रज्ञान विभाग व संचालक NIC यांनाही बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत प्रथम टप्प्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांचे RFP Document तयार करणे, निविदा प्रक्रिया व निविदा प्रक्रियेशी संबंधित कामकाजाकरीता मे. केपीएमजी या सल्लगार संस्थेची नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता. मे. केपीएमजी या संस्थेच्या नेमणूकीबाबत मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :- "मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट अ‍ॅन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."**

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार मे. केपीएमजी या आयटी कन्सल्टंट कडून १ सिनियर कन्सल्टंट व १ कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आली होती. मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत खालील

विविध योजनांच्या कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत मान्यता देण्यात आली होती.

१. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करणे, सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्याबाबतचे RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
२. उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करण्याकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
३. बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची (मोबाईल डे-केअर सिस्टम) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
४. बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबतच्या योजनेची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
५. मंडळास बाहय संस्थेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी संस्था निवडीकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

मंडळाच्या उपरोक्त मान्यतेनुसार मे. केपीएमजी यांना RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत कळविण्यात आले होते.

दि.२३.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. केपीएमजी यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली होती त्या मागणीस अनुसरून मंडळाच्या बैठकीत शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.त्यानुसार मे. केपीएमजी यांना अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करून पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मे. केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेवर सहा सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली होती.

मंडळाच्या वेळोवेळी संपन्न बैठकीत पारित ठरावानुसार प्रथम दि.३१ मार्च २०१९ व नंतर दि.३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली होती.

तथापि, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पत्र क्र. इबांका-२०१९/प्र.क्र.११८/काम-७ दि.१४.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सध्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजाची व्याप्ती सध्या अवाक्यात आलेली आहे. सबब मे. के.पी.एम.जी. या संस्थेची किंबहुना माहिती व तंत्रज्ञान सल्लागाराची मंडळास तुर्तास आवश्यकता उरलेली नाही. परिणामी मे. के.पी.एम.जी. या संस्थेची मंडळामार्फत सल्लागार

म्हणून केलेली नेमूणक दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ पर्यंत समाप्त करण्याच्या अनुषंगाने कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले होते व त्यास त्यास अनुसरून मे. केपीएमजी या संस्थेच्या सेवा समाप्त करण्यात आल्याबाबत दि.१५.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत सद्यस्थितीत खालील ई-निविदांची/ EOI बाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

०१. मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरविणे (गट-०१ मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती)

०२ मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरविणे (गट-०२ नागपूर व औरंगाबाद)

०३. मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता पाळणाघराची सुविधा पुरविणे

०४. नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या (RPL) प्रस्तावाची छाननी व प्रशिक्षणाकरीता समन्वय ठेवणे.

०५. मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीकरणाच्या कामकाजाकरीता समन्वय ठेवणे.

वरील ०३ योजनांपैकी गृहपयोगी वस्तू संच पुरविणे गट-०१ व गट-०२ या योजनेची ई-निविदा पूर्व बैठक झालेली असून सदर निविदा पूर्व बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यांवर कार्यवाही करणे, निविदांची छाननी करणे, योजनांच्या RFP प्रारूप तयार करणे इत्यादी बाबींकरीता ई-गव्हर्नन्स सल्लागार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

वरील बाबींच्या अनुषंगाने योजनांच्या कार्यवाहीकरीता कमीत कमी ०३ सल्लागारांची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे. सदर नियुक्ती करताना खालीलप्रमाणे दोन पर्याय उपलब्ध आहे.

१) माहिती व तंत्रज्ञान विभागाचा शासन निर्णय दि. ०९.०५.२०१९ अन्वये घोषित पॅनेलवरील संस्थापैकी एका संस्थेकडून ०३ सल्लागारांची शासन निर्णयान्वये मंजूर दरानुसार नियुक्ती करणे **किंवा**

२) वर्तमानपत्रात अल्प कालावधीची जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून ०३ सल्लागारांची नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

याबाबत मंडळ मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले की, वर्तमानपत्रात अल्प कालावधीची जाहीर निविदा सूचना प्रसिध् करून ०३ सल्लागारांची नियुक्ती करण्यात यावी. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला

**ठराव क्र. ५४(३)/२०२०:- मंडळ स्तरावर मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संच पुरविणे (गट-०१ व गट ०२), बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता पाळणाघराची सुविधा पुरविणे, बांधकाम कामगारांकरीता कौशल्य विकास प्रशिक्षण (RPL) च्या प्रस्तावाची छाननी करणे, मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीकरणाच्या कामाकरीता समन्वय ठेवणे या व इतर कामाच्या निविदाविषयक सर्व कामे, EOI, नियुक्त संस्थांशी समन्वय इत्यादी सोपविलेली कामे करण्याकरीता वर्तमानपत्रात अल्प कालावधीची जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करून ०१ वर्षाकरीता ०३ सल्लागारांची नियुक्ती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०४:- मंडळाविरूध्द मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणी संबंधित न्यायालयाशी संपर्क साधणे, न्यायालयीन प्रकरणांचे परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे, सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेअंती न्यायालयात सादर करणे इतर अनुषंगिक कामाकरीता विधी सल्लागार त्यांची नेमणूक करणेबाबत विचार विनिमय करणे**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६, इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९६ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७, च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात इमारत व इतर बांधकाम कामाच्या ठिकाणी सदर कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असून अंमलबलावणी करतेवेळी आस्थापना, ठेकेदार, तसेच सदर कायदेयान्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदित होणाऱ्या बांधकाम कामगारांद्वारे ( योजनेसंबधी) मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या जात आहेत. सदर याचिके अंतर्गत मा. प्रधान सचिव (कामगार), मा.कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी , म.इ.व.इ.बां.का.क., मुंबई संबधित जिल्हयाचे सहाय्यक कामगार आयुक्त यांना प्रतिवादी म्हणून यांचे विरुध्द याचिका दाखल करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने उक्त नमूद अधिकारी/पदधिकारी यांना न्यायालयात त्या विषयी प्रतिज्ञापत्र / शपथपत्र दाखल करुन आपली बाजू मांडणे अभिप्रेत आहे.

मंडळ कार्यालयाकडील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण कायदेविषयी न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिका व त्यामधील मुद्याबाबत परिच्छेद निहाय अभिप्राय तयार करणे, शपथपत्र तयार करणे व न्यायालयीन प्रकरणात युक्तीवाद करणे करिता कायमस्वरूपी वकिल नियुक्त नाही.

सद्य:स्थितीत मंडळाकडे एकूण ०९ न्यायालयीन प्रकरणे सुरु आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणात कायदेशीर सल्ला मिळवून लवकरात लवकर प्रकरणातील मुद्याबाबत शपथपत्र तयार करून न्यायालयात सादर करणे आवश्यक असल्यामुळे मा.उच्च न्यायालयातील या विषयातील जाणकार वकिलाची या कामी मदत घेणे आवश्यक आहे.

मंडळाकडील एकूण ०९ न्यायालयीन प्रकरणांपैकी मा.सर्वोच्च न्यायालयात ०१ याचिका व मा.उच्च न्यायालय, मुंबई/ औरंगाबाद खंडपीठात ०८ याचिका दाखल झालेल्या आहेत.

सदर ०९ न्यायालयीन प्रकरणांचा प्रकरणनिहाय तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | न्यायालय व याचिका क्रमांक | याचिकाकर्ता व प्रतिसादक | याचिकर्ता यांचेद्वारे करण्यात आलेली मागणी | प्रकरणांची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | मा.उच्च न्यायालय,मुंबई<br>एल क्रमांक /२०१८/२०१३ | १.मे.व्होल्टास लिमिटेड<br>२.श्री.राजेशकुमार लक्ष्मीदास भाटिया शेअर होल्डर<br>**विरूध्द**<br>१.महाराष्ट्र शासन-उद्योग उर्जा व कामगार विभाग , मुंबई.<br>२.सरकारी कामगार अधिकारी आणि निरिक्षक | • महाराष्ट्र शासनाची दि.१८.०८.२०१७ रोजीची सुचना याचिकाकर्त्यांना बंधनकारक नाही ती रद्दबाद करावी.<br>• रिट याचिकेची सुनावणी व अंतिम विल्हेवाट लावेपर्यंत अधिसूचनेचा प्रभाव लागू करु नये.<br>• प्रतिवादीने क्रं.२ ने दि.१४.०३.२०१८ जारी केलेली नोटिसचा प्रभाव लागू करु नये. | • प्रतिवादी क्र.१ व २ च्या वतीने प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.०२.०८.२०१९ रोजी सादर केले आहे.<br>• मा.उच्च न्यायालयाने दि.०५.०२.२०२० रोजीच्या आदेशाप्रमाणे सदर न्यायालयीन प्रकरण योग्य न्यायालयासमोर पडताळणी करण्याकरिता ठेवण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.<br>• पुढील न्यायालयीन सुनावणी दिनांक १६.०४.२०२० रोजी आहे. |
| २ | मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ - औरंगाबाद<br>५५३२/२०१८ | श्री.माधव गोंविद शेळके व इतर ३३ (लातूर)<br>**विरूध्द**<br>१.महाराष्ट्र शासन (सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग)<br>२.आयुक्त व अध्यक्ष,म.इ.व.इतर बांधकाम | • पेन्शन योजनेची अंमलबजावणी करावी -याचिकाकर्त्यांना साठ वर्ष पूर्ण झाल्यावर निवृत्तीवेतन मिळावे.<br>• याचिकाकर्त्यांना घरे बांधण्याकरीता कर्ज आणि आगावू रक्कम मंजूर करावी.<br>• प्रतिवादी क्रंमाक २ ला वरील अ.क्रं. १ व २ | • प्रतिवादीच्या वतीने प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात येथे दि.०३.१०.२०१९ रोजी सादर केले आहे.<br>• मा. न्यायालयाने दिनांक ०१.१०.२०१९ रोजीच्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कल्याणकारी मंडळ,मुंबई.<br>३. सचिव,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.<br>४.उपआयुक्त,कामगार आयुक्त,औरंगाबाद<br>५.सहाय्यक कामगार आयुक्त,लातूर | संदर्भात पाठविलेले पत्र दि.२९.१२.२०१५ व स्मरणपत्र दि.२८.११.२०१६ विचारात घेण्याबाबत निर्देशित करावे. | आदेशानुसार वादीच्या बाजूने न्यायालयात कोणीही हजर झाले नाहीत.<br>• पुढील न्यायालयीन सुनावणी दिनांक २०.०४.२०२० रोजी आहे. |
| ३ | मा.उच्च न्यायालय,मुंबई<br>डब्लूपी (स्टॅम्प) क्र.३५५८/२०१९ | मे. यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था,मर्यादित (श्रीमती संगिता अनिल दशपुते)<br>**विरूध्द**<br>- महाराष्ट्र शासन (सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग)<br>- सचिव ,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई<br>- आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष, कामगार विभाग,मुंबई | • मा. न्यायालयाने शासन आदेश दि.१७.०२.२०१९ रद्दबाद करावा व प्रतिवादीला क्लेम विचारात घेण्यासाठी निर्देश दयावेत.<br>• निविदेतील किमान उलाढालीबाबत मर्यादा ठेवण्याचे कलम बाजूला ठेवावे.<br>• सदर याचिकेच्या अंतिम सुनावणी व विल्हेवाट लावेपर्यंत निविदेची पुढील कार्यवाही थांबवावी.<br>• संपूर्ण निविदा कार्यवाही रद्द करावी. | • मसुदा प्रतिज्ञापत्रास शासन मान्यता प्राप्त झाली असून मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करणे प्रस्तावित आहे.<br>• सदर न्यायालयीन प्रकरणांची पुढील सुनावणी दि. २४.०८. २०२० रोजी ठेवण्यात आली आहे. |
| ४ | मा.उच्च न्यायालय,मुंबई-<br>रिट याचिका क्र.६६८/२०१९ | जी.ई.टी ॲण्ड डी इंडिया लि.(पुर्वीचे ॲलस्टॉम टी ॲण्ड डी इंडिया लि.)<br>**विरूध्द**<br>- भारत सरकार (सचिव,कामगार आणि रोजगार | • मा. न्यायालयाने याचिकाकर्त्याचे केस संबधित उपकरणाच्या डिझाइन व पुरवठा बाबत उपकर भरणा केल्याबाबत कागद पत्र मागवून त्यांची वैधता आणि कायदेशीर तपासणी | • प्रतिवादी क्र.३ च्या वतीने मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दि.१८.०४.२०१९ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.<br>• प्रतिवादी क्र.२ च्या वतीने मा.उच्च न्यायालयात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मंत्रालय,नवी दिल्ली)<br>- महाराष्ट्र शासन (सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मुंबई)<br>- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित(अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,मुंबई) | करुन शासनाचे दिनांक ३०.०६.२०१६ रोजीचे परिपत्रक बाजूला ठेवावे.<br>• मा.न्यायालयाने १ टक्का भरणा केलेल्या उपकर परताव्याबाबत प्रतिवादी क्रं३ ला निर्देश दयावेत.<br>• मा. न्यायालयाने उपकरणाच्या डिझाईन व पुरवठावर कामगार कल्याण उपकर कापण्यास प्रतिबंध करावे<br>• मा. न्यायालयाने याचिकेची सुनावणी व अंतिम आदेश होइपर्यंत प्रतिवादी क्रं.३ यांनी पुढे होण्या कामातून उपकर वसूली न करण्यास निर्देश दयावेत | प्रतिज्ञापत्र सादर करणे आहे.<br>• मा. न्यायालयाकडून पुढील सुनावणी दिनांक प्राप्त नाही. |
| ५. | मा.उच्च न्यायालय,मुंबई<br>याचिका क्र.१११७०/२०१६ | १. श्रीमती. उल्का पांडूरंग कांबळे व इतर १८<br>**विरूध्द**<br>१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई<br>२. महाराष्ट्र राज्य (आयुक्त, कामगार विभाग, मुंबई)<br>३.सहाय्यक कामगार आयुक्त,सांगली<br>४.सहाय्यक कामगार | • कामगाराच्या मृत्यू नंतर त्यांचे कायदेशीर वारसास देय असलेल्या अंत्यविधी अर्थसहाय्य रक्कम रू.५०००/- व दरमहा रू.१०००/- प्रमाणे पाच वर्षाकरीता अर्थसहाय्य व मृत कामगाराच्या वारसास रक्कम रू.२,००,०००/- अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभाचे वाटप केलेले नाही व सदर लाभ मिळवून देणेकरीता असमर्थता दर्शविलेली आहे. | • सदर याचिकेधील मुद्याबाबतचे शपथपत्र दि.२४.०९.२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयात सादर केले आहे.<br>• दि.०३.०३.२०२० रोजी झालेल्या न्यायालयीन सुनावणीत सरकारी वकीलानी सांगितलेल्या प्रमाणे वादीना योजनेचे लाभ वाटप केल्याबाबत प्रतिज्ञापत्र प्रतिवादीकडून सादर करणे आहे.<br>• उक्त प्रकरणी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आयुक्त,कोर | • मृत कामगारांच्या कायदेशीर वारसास देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे मोटार वाहन नियम, १९८८ अंतर्गत देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाई नुसार देण्यात यावे, अशी तरतूद करण्यात यावी | मंडळाच्या वतीने अतिरिक्त म्हणजे न्यायालयास सादर करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र दि.०४.०३.२०२० पत्रान्वये सहाय्यक कामगार आयुक्त सांगली यांना कळविले आहे.<br>• पुढील न्यायालयीन सुनावणी दि.१८.०३.२०२० रोजी आहे. |
| ६ | मा. सर्वोच्च न्यायालय | मो. युनूस व इतर विरूध्द संघ भारत व इतर | • प्रतिसादक यांना योग्य ते आदेश, मार्गदर्शक निर्देश देण्यात यावेत.<br>• प्रतिसादक यांनी चूकीचा असलेला कायद्याअंतर्गत योग्य नियम करण्याबाबत योग्य ते आदेश, मार्गदर्शक निदेश देण्यात यावेत.<br>• चूकीचा असलेल्या कायद्याअंतर्गत बदल घडवून येईपर्यंत उपकर वसूलीच्या कार्यवाहीस स्थगीती देण्यात यावी.<br>• या संबंधी इतर किंवा पुढील निर्णय पारित करणे जेणे तो योग्य आहे असे समजण्यात येईल . | • प्रतिवादी क्र.३० (महाराष्ट्र शासन) यांच्या वतीने प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे.<br>• पुढील न्यायालयीन सुनावणी दि.२०.०४. २०२० रोजी आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | मा.उच्च न्यायालय,मुंबई - ६७२६ /२०१७ | जनरल कामगार युनियन, सोलापूर.<br>**विरुध्द**<br>१.मा. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग,<br>२. मा.कामगार आयुक्त.<br>३. सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर | • वैद्यकीय लाभ, शिष्यवृत्ती अर्थसहाय्य, अंत्यविधी अर्थसहाय्य,पेन्शन व मृत कामगाराच्या कायदेशीर वारसास दाव्याबाबतची रक्कम अदा करण्याबाबतचे निर्देश द्यावे. | • प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर<br>• पुढील न्यायालयीन सुनावणी दि.१७.०३.२०२० रोजी आहे |
| ८ | मा.उच्च न्यायालय,मुंबई अवमान याचिका क्र.५०५/२०१८ (मूळ याचिका ११६८३/२०१६) | जनरल कामगार युनियन, सोलापूर<br>**विरूध्द**<br>१.मा. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय मुंबई ३२<br>२. मा. कामगार आयुक्त,मुंबई<br>३. सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर | • मूळ याचिका क्र.११६८३/२०१६ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणी दि.२४.१०.२०१६ रोजी निकाल पारित करून ०८ आठवडयात निर्णय घेऊन व त्यावर अंमलबजावणी करण्याचे आदेश शासनास दिलेले असता. मंडळाने दि.२३.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आपले अभिप्राय कळविले होते. सदर अभिप्रायास उडवाउडवीचे उत्तर दिल्याबाबतचे गृहीत धरून जनरल कामगार युनियन संघटनेमार्फत अवमान याचिका क्र. १३६५१/ २०१७ दाखल करण्यात आली आहे. | सदर अवमान याचिकेमधील मुद्यांबाबत शपथपत्र दि.२८.०८.२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे.<br>पुढील न्यायालयीन सुनावणी दि.१९.०३.२०२० रोजी आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | मा.उच्च न्यायालय,मुंबई ११९७२/२०१६ | श्री. संतोष प्रकाश तेली व इतर ११<br>**विरूध्द**<br>१.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई<br><br>२.सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली<br><br>३.सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर<br><br>४.सरकारी कामगार अधिकारी, सिंधुदूर्ग | • ग्रामीण भागात घरबांधणीचा अंदाजे खर्च रक्कम रू.१०.०० लाख येतो. म्हाडाची याबाबतची आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी माफक दरात घर उपलब्धतेची योजना राबविली जाते. सदर योजना अंतर्गत मंडळातील नोंदीत कामगारांचा समावेश करण्यात येऊन सदर EWS योजनेंतर्गत लाभार्थींना या योजनेशी जोडून घरबांधणी योजनेचा लाभ रक्कम रू.१०.०० लाख करण्यात यावा. | • पुढील न्यायालयीन सुनावणी दि.१८.०८.२०२० रोजी आहे |

शासन/कामगार आयुक्त/ मंडळाच्या विरूध्द मंडळाच्या कामकाजाच्या अनुषंगाने दाखल उपरोक्त याचिका व भविष्यात मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या याचिका /रिट याचिका च्या अनुषंगाने मंडळाने करावयाच्या न्यायालयीन कार्यवाहीकरीता (परिच्छेदनिहाय शपथपत्र तयार करणे, शपथपत्र न्यायालयात सादर करणे सुनावणीच्या वेळी हजर राहणे इत्यादी कामाकरीता) कंत्राटी पध्दतीने विधि सल्लागाराची नेमणूक करणे, नेमणूकीचा कालावधी व मासिक व्यवसायिक शुल्क निश्चित करण्याबाबत विचारविनिमय करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले की, मंडळाकडे प्रलंबित मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील याचिकांची माहिती राज्याचे महाधिवक्ता यांचेकडे पाठवावी व त्यांच्या सल्ल्याने विधी सल्लागार व मासिक मोबदला निश्चित करण्यात यावा.

सदर विषयी मंडळाच्या बैठकीत सविस्त्र चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५४(४)/२०२० :-मंडळाच्या कामकाजासंबंधी शासन, कामगार आयुक्त व मंडळाचे विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च् न्यायालयाचे मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद खंडपीठात दाखल याचिका व भविष्यातील याचिके संदर्भात संबंधित न्यायालयातून याचिकेची प्रत प्राप्त करणे, परिच्छेदनिहाय शपथपत्र तयार करणे, शपथपत्र न्यायालयात सादर करणे, आवश्यकतेनुसार वकीलाच्या नियुक्तीस मदत करणे, मंडळाच्या वतीने न्यायालयात हजर राहणे इत्यादी कामकाज व यासंबंधीचा पत्रव्यवहार करण्यासाठी विधी सल्लागाराची नियुक्ती करण्यात यावी. विधी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी प्रस्तावित याचिकांची माहिती व अपेक्षित कामकाजाचे स्वरूप याबाबतची माहिती मा. महाधिवक्ता,महाराष्ट्र राज्य यांचेकडे सादर करावी व त्यांच्या सल्ल्याने विधी सल्लागार व त्यांचे मासिक मानधन निश्चित करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०५:- सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या लेखाविषयक कामकाजासाठी व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालांची नियुक्तीस मुदतवाढ देणे बाबत विचारविनिमय करणे.**

मंडळाच्या सचिवांनी असे सादर केले की, मंडळाच्या दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळाचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाचे लेखा, लेखांकन व आयकर विषयक कामकाज पुर्ण करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या पॅनलवरील सनदी लेखापालांची सदर कामकाजासाठी नियुक्ती करण्यासाठी तीन दरपत्रके मागवून सनदी लेखापालांची नियुक्ती करणेबाबत सर्वानुमते ठराव करण्यात आला होता. त्यानुसार तीन दरपत्रके मागवून खालीलप्रमाणे कमी दर असलेल्या मे. संघवी ॲड कंपनी, घाटकोपर मुंबई यांना मंडळाचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाचे लेखा, लेखांकन व आयकर विषयक कामकाजासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

| अनु क्र. | वर्ष | कामकाजाचे स्वरुप | दर |
|---|---|---|---|
| १. | २०१६-१७ व २०१७-१८ | लेखा, लेखांकन विषयक कामकाज | ३,००,०००/- प्रत्येक वित्तय वर्षासाठी (जीएसटी सह) |
| २. | २०१७-१८ | आयकर विषयक कामकाज | ६०,०००/- (जीएसटी सह) |

मे. संघवी ॲड कंपनी, घाटकोपर मुंबई यांनी मंडळाच्या सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षाच्या लेखा, लेखांकन व आयकर विषयक कामकाज विहीत वेळेत पूर्ण करुन मंडळास सादर केले.

मंडळाच्या सन २०१८-१९ या वर्षाच्या लेखांकन व आयकाराचे विहीत मुदतीत पुर्ण होणे आवश्यक असल्यामुळे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे लेखाविषयक व आयकर बाबत कामकाज करणेसाठी मे. संघवी ॲड कंपनी, घाटकोपर मुंबई यांना मुदत वाढ देण्याबाबत मंडळाच्या दि. ०३.०६.२०१९ च्या बैठकीत मंडळाच्या मान्यतेसत्व सादर करण्यात आला व त्यांत खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला होता.

**ठराव क्र.५१(१५-०३)/२०१९ :- मे. संघवी ॲड कंपनी घाटकोपर मुंबई या सनदी लेखापालांच्या नियुक्तीस एक वर्षाची मुदतवाढ व वार्षिक शुल्क रु. ३.०० लक्ष**

**अदायगीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, सन २०१९-२० या वर्षाचे आयकर विषयक कामकाज करण्यास व अपेक्षित खर्च रु. ६०,०००/-एवढया अदायगीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

वरिलप्रमाणे मे. संघवी अँड कंपनी यांनी मंडळाचे सन २०१८-१९ चे वार्षिक लेखे तयार करणे व सन २०१९-२० चे आयकर विषयक कामकाज पूर्ण केले आहे. याप्रमाणे सन २०१९-२० चे मंडळाचे लेखे पूर्ण करावयाचे आहेत. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मे. संघवी अँड कंपनी यांनी यापूर्वी मंडळाचे सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या तीन वर्षांचे लेखे तयार करण्याचे काम पूर्ण केले आहे तसेच सन २०१७-१८ ते सन २०१९-२० चे आयकर विषयक कामकाज केले आहे. सन २०१९-२० या चालू लेखे तयार करण्यास व सन २०२०-२१ या आगामी आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक काम पूर्वीच्या दराने करण्यास लेखी सहमती दिली आहे. सन २०१९-२० या चालू वर्षाचे लेखे तयार करण्याचे काम व वार्षिक शुल्क रू. ३.०० लक्ष तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाज व अपेक्षीत खर्च रू. ६०,०००/- या दराने मे. संघवी अँड कंपनी या सनदी लेखापालांची नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आलेला आहे.

याबाबत, मंडळ अध्यक्ष यांनी निर्देश दिले की, मे. संघवी ॲण्ड कंपनी या सनदी लेखापालाच्या नियुक्तीस यापूर्वीच दोनवेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. पुनश्च: मुदतवाढ देण्याऐवजी मंडळाचे वार्षिक लेखे तयार करणे, आर्थिक वर्षाचे वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी स्वतंत्रपणे दरपत्रक मागवून सनदी लेखापालाची नियुक्ती करणे योग्य राहील. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५४(५)/२०२० :- मंडळाचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी स्वतंत्रपणे दरपत्रके मागवून सनदी लेखापालाची नियुक्ती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०६:- मंडळाच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांस मान्यता प्रदान करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे, लेखापरीक्षण अहवालासह विधीमंडळासमोर सादर करणेसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १ अन्वये सन २००७-०८ ते २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या, मंडळाच्या दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १४ अन्वये सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या व मंडळाच्या दि. ०१.०३.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ९ अन्वये सन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांस मान्यता देण्यात आली होती. सदर वर्षांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून दि. ०९.०७.२०१९ ते ३१.०७.२०१९ या कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे. तसेच त्याच्या लेखापरिक्षण अहवालाचे अनुपालनही शासनास दि.१६.०१.२०२० रोजी सादर करण्यात आले आहे. सन २००७-०८ ते २०१५-१६ चे वार्षिक अहवाल लेखापरीक्षण अहवालासह शासनास सादर करण्यात येऊन विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आले आहेत. सन २०१६-१७ व २०१७-१८ चे वार्षिक अहवालास दि. १३.०२.२०२० रोजीच्या मंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली असून सन २०२० च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात विधीमंडळात अहवाल सादर करणे प्रस्तावित आहे.

मंडळाचे सन २०१८-१९ या वर्षाचे लेखा अहवाल मंडळाने नियुक्त केलेल्या मे. के. एस. संघवी या सनदी लेखापालांकडून पूर्ण करून घेण्यात आला आहे. सन २०१८-१९ चे लेख्यांस मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करण्यात येईल. सन २०१८-१९ चे वार्षिक लेखे मंजूरीचा प्रस्ताव मंडळास सादर करण्यात आला आहे.

मा.कामगार आयुक्त तथा मंडळ सदस्य यांनी विचारणा केले की, अधिनियमातील तरतूदीनुसार प्रशासकीय खर्चाची मर्यादा किती आहे व सन २०१८-१९ मध्ये किती खर्च झाला आहे याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च रू.३७३.७७ कोटी झाला असून प्रशासकीय बाबींवर रू.१४.९४ कोटी झाला असून प्रशासकीय खर्चाची टक्केवारी ३.९९% आहे. सबब, अधिनियमातील तरतूदीच्या मर्यादेत खर्च झालेला आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५४(६)/२०२० :-मंडळाचे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक लेख्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहेत, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |